## अधिसूचना

क्र. : ११४/२०१३ दि. १०/१०/२०१३

विषय : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालय व शैक्षणिक विभागांना परिषदा/ कार्यशाळा / चर्चासत्र/परिसंवाद आयोजनाकरिता विद्यापीठ साधारण निधी मधुन आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागामध्ये व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात येत असलेल्या राष्ट्रीय/ राज्य/ विभागीयस्तरीय परिषदा / कार्यशाळा/ चर्चासत्र/ परिसंवाद आयोजनाकरिता विद्यापीठ साधारण निधी मधुन अनुक्रमे रु. २०,०००/- १०,०००/- ५,०००/- चे आर्थिक सहाय्य मंजुर करण्यात येते याबाबत अधीसुचना क्रमांक १६०/२०१० दि.२८.१०.२०१० अन्वये विद्यापीठ राजपत्र भाग -२ मध्ये प्रकाशित करण्यात आले आहे.

यासंदर्भात व्यवस्थापन परिषदेने दि. ११.०३.२०१३ च्या सभे मध्ये बाब क्र. ८७ अन्वये निर्णय घेतल्यानुसार संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागामध्ये व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीयस्तरीय परिषदा / कार्यशाळा/ चर्चासत्र/ परिसंवाद आयोजनाकरिता विद्यापीठ साधारण निधी मधुन रु. ४०,०००/- आर्थिक सहाय्य मंजूरीची तरतुद उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांनी तसेच संलग्नित महाविद्यालयांनी विद्यापीठ साधारण निधी मधुन अर्थ सहाय्य मागणी करीत असतांना नियमांच्या तरतूदी अंतर्गत विहीत प्रपत्रामध्ये व निश्चित केलेल्या तारखापुर्वी विद्यापीठाकडे अर्ज सादर केल्यास त्याचा विचार करण्यात येईल.

स्वा/-
(दिनेश कुमार जोशी)
कुलसचिव
संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ,अमरावती

******